४६६५८-५९

जाक्र.प्राथ.२/ प्रशा/कोवि/

शिक्षण उपसंचालक कार्यालय,कोल्हापूर

दिनांक :- 15 DEC 2003

प्रति,

O.I.G.3 अध्यक्ष/सचिव,

सांगली मिशन सोसायटी

अत ता अत जि सांगली

विषय :- नविन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी.

संदर्भ :- मंत्रालय शालेय शिक्षण विभाग,मुंबईकडील पत्र क्र. ~~वीतमहरु~~-१००३/(८९६/२००३)/प्राशि-३...
दि ५ नोव्हेंबर २००३

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या अटी पूर्ण करीत असल्यास अत ता अत जि सांगली येथे ....इंग्रजी.... माध्यमाची नविन शाळा सन .२००३-२००४.. या शैक्षणिक वर्षापासून कायम विना अनुदान तत्वावर उघडण्याची परवानगी देण्याचे आदेश शासनाकडून प्राप्त झालेले आहेत. त्या अटी पूर्ण केल्यानंतर आणि त्या पूर्ण केल्याबाबत तपासणी अधिका-याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आपल्या संस्थेस परवानगी दिल्याचे रितसर वेगळे आदेश देण्यात येतील. याबाबत आपल्या शाळेचा विहित प्रपत्रातील अहवाल शिक्षणाधिकारी प्राथमिक/ ~~प्रशासन~~ ~~अधिकारी~~,~~प्राथमिक शिक्षण मंडळ~~ ....सांगली.... यांचेकडून मागविण्याबाबत त्यांना कळविण्यात आले आहे.

शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग कोल्हापूरकरिता.

प्रत :-

शिक्षणाधिकारी,प्राथमिक ~~जिल्हा परिषद~~ सांगली

प्रशासन अधिकारी नगरपालिका शिक्षण मंडळ .......

२/- त्यांना कळविण्यात येते की, वरील संस्थेची/शाळेची तपासणी करुन सोबत जोडलेल्या १ ते १२ मुद्यांवरील माहितीचा अहवाल चार दिवसांचे आत या कार्यालयास सादर करावा. तसेच प्रस्तावासोबत संबंधित संस्थेकडून सदरची शाळा ही कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर ... शासनाकडे कोणत्याही ... या कार्यालयास सादर करावे.
च्या ...

जा. क्र. प्राथ/आस्था१०/खाप्राशा/४१६
प्राथमिक शिक्षण विभाग जि. प. सांगली
दिनांक ४-१०-२००४

प्रति,
मुख्याध्यापक,
अल्फान्सो स्कूल, जत
ता० जत

विषय:-खाजगी प्राथमिक शाळेस प्रथम मान्यतेबाबत

संदर्भ:-१]जा. क्र. प्राथ//प्राशा/कोवि/ /
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
दिनांक / /
२]शिक्षण समिती सभा ठराव क्रं. २३५ दि. ३१-७-२००४

वरील विषयास अनुसरुन आपणास कळविण्येत येते की आपला खाजगी प्राथमिक शाळाचा १ ते १२ मुधाचा अहवाल यापूर्वी शासनास सादर केलेला आहे. आपणास ही नुतणीकरण परवानगी शिक्षण उपसंचालक कार्यालय कोल्हापूर कडून देणेत आलेली आहे. आपल्या खाजगी प्राथमिक शाळेस जिल्हा शिक्षण समिती जि. प. सांगली ठराव नं. २३५ दि. ३१-७-२००४ अन्वये खालील अटी व शर्तिस अधिन राहून प्रथम मान्यता देणेत येत आहे.

१]शाळा सुरु झालेल्या दिनांकापासून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना आपले शाळेत न घेणेचे ह अटीवर मान्यता देणेत येत आहे
२]शासनाचे वेळोवेळी निघणा-या आदेशांचे[वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इ. ]काटेकोरपणे पालन केले पाहीजे.
३]संस्था अनाधिकृत वर्ग/तुकड्या सुरु करणार नाही.
४]संस्थेने शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य व इतर भौतिक सुविधांची सोय केली पाहिजे.
५]शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित अनुशेषानुसार प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दराने वेतन व भत्ते आदा करणे आवश्यक आहे.
६]आरक्षणाच्या विहित टक्केवारीनुसार प्राथमिक शिक्षकांची नेमणूक करणे आवश्यक आहे.
७]सरासरी उपस्थितीचे विहीत प्रमाण [illegible]शनिहाय]असणे आवश्यक आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद सांगली ४१६४१६

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१]मा. शिक्षण उपसंचालक,
शिक्षण उपसंचालक, कार्यालय,
कोल्हापूर.
२]गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती,

महाराष्ट्र शासन

शासन परवानगी आदेश

क्र.- इंमाशा २०१०/(२५२/१०/माशि-१,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२,
दिनांक:- १९/२/२०११.

प्रति,

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे.

विषय : इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून इ. ८ वी ते इ. १० वी अथवा इ. ८ वी ते इ. १२ वीचे इंग्रजी माध्यमाचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :-१) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१०/३/२०१०.
२) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१४/१०/२०१०
३)संस्थेचा क्र.GES/Ro/४३९/२०१०-११,दि.२६.४.२०१० रोजीचा अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रे.

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सांगली मिशन सोसायटी, जि.सांगली या संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या अल्फोन्सा स्कूल, भोसले वस्ती, जत येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ. ८ वी ते इ. १२ वीचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे :-

१) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्रा करिता (प्रथम प्रोव्हीजनल व नंतर रेग्युलर) अर्ज करणे आवश्यक राहील.
२) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफीलीएशन) आवश्यक असणाऱ्या सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील.
३) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता(रेग्युलर ॲफीलीएशन)निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.
४) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
५) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणाऱ्या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.
६) परवानगी देण्यात आलेल्या इ. ८ ते १२ वीच्या वर्गांमध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील.
७) परवानगी आदेशाच्यावेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना या आदेशाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

(डॉ. सुवर्णा सि.खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे
मा.मंत्री(शाशि) यांचे खाजगी सचिव /मा.राज्यमंत्री (शाशि) यांचे खाजगी सचिव
विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर / शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, सांगली
सचिव, सांगली मिशन सोसायटी, मिरज, जि.सांगली.
निवड नस्ती, माशि-१.

SEC. EDN. KOLHAPUR DIV. BOARD M.S.B. OF SEC. & HIGHER KOLHAPUR. 416 004.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६ ००४.**

क्र.कोविमं/डीपी/मान्यता/१७७
कोल्हापूर, दि.२७ एप्रिल, २०११.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग,
कोल्हापूर.

विषय:- इंग्रजी माध्यमाच्या इ. ८ वी ते इ. १२ वी पर्यंचे वर्ग कायम विनाअनुदान तत्त्वावर सुरु करण्यास शासन निर्णय दिनांक- १७/०३/२०१० नुसार परवानगी देण्यात आलेल्या शाळांना मान्यता (Recognition) संलग्नीकरणाबाबत.. .. ..

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र. नमाशा/२०१०/(९६-२०१०) माशि-१ ,दिनांक- १०/०३/२०१०.
२) शासन निर्णय क्र.नमाशा/२०१०/९६/१०/माशि-१, दिनांक- १४ ऑक्टोबर, २०१०
३) क्र.रा.मं./परीक्षा-५/६८१४ पुणे, दिनांक- १८/१०/२०१०.
४) क्र.रा.मं./परीक्षा-५/१६१९ पुणे, दिनांक- १६/०३/२०११.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भालिखित शासन निर्णयानुसार या विभागीय मंडळातील खालील पाच (०५) इंग्रजी माध्यमाच्या शाळांना इ. ८ वी ते इ. १२ वी पर्यंतचे वर्ग कायम विनाअनुदान तत्त्वावर सुरु करण्यास परवानगी देण्यात आली असून या शाळांना मंडळामार्फत मान्यता व संलग्नीकरण (Recognition) देण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव | शासन परवानगी आदेश क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शिवाई साहित्य कला प्रतिष्ठान, सातारा | शिवाई इंग्लिश मिडीयम स्कूल, वडूज ता.खटाव जि.सातारा | क्र.इंमाशा २०१०/३६८/२१०/माशि-१, दिनांक-१०/०२/२०११ |
| २ | कराड जनता चॅरिटेबल एज्युकेशनल ॲण्ड सायंटिफिक रिसर्च सेंटर, कराड जि.सातारा | जनता इंग्लिश मिडियम स्कूल, कराड जि.सातारा | क्र.इंमाशा-२०१०/(१६६/१०)/माशि-१, दिनांक-१०/०२/२०११. |
| ३ | तिरंगा एज्युकेशन सोसायटी, पाचवड ता. वाई जि.सातारा | तिरंगा इंग्लिश मिडियम स्कूल, पाचवड ता. वाई जि. सातारा | क्र.इंमाशा-२०१०/(१३५/१०)माशि-१, दिनांक- ११/०३/२०११. |
| ४ | सांगली मिशन सोसायटी, सांगली जि.सांगली | अल्फोन्सा स्कूल, [illegible] वस्ती , जत जि. सांगली | क्र.इंमाशा-२०१०/(२५१/१०)माशि-१, दिनांक-११/०२/२०११. |
| ५ | संजीवनी चॅरिटेबल ट्रस्ट, कुरुंदवाड ता. शिरोळ जि.कोल्हापूर | संजीवनी इंग्लिश मिडीयम स्कूल, कुरुंदवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर | क्र.ईमाशा-२०१०/(२४१/१०) माशि-१, दिनांक-१०/०२/२०११ |

या शाळांना मंडळाची मान्यता (Recognition) व संलग्नीकरण देण्याबाबत संदर्भ क्र. ०२ च्या शासन आदेशानुसार कार्यपध्दती निश्चित केली आहे. त्यामध्ये असे प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालकामार्फत शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्याकडे पाठवावेत व संबंधित शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना खालील नमूद पथकामार्फत माध्यमिक शाळा संहितेच्या तरतुदीनुसार तपासणी करुन शाळा मान्यता व संलग्नीकरण प्रस्तावाबाबत त्यांचा अहवाल शाळा प्रथम मान्यता नमुना प्रपत्र अ, ब, क नुसार शिक्षण उपसंचालकाकडे सादर करावा असे नमूद केले आहे.

HIGHER SEC. EDN. KOLHAPUR BOARD
KOLHAPUR.
416004.



| | | |
|---|---|---|
| १ | शिक्षणाधिकारी माध्यमिक | पथक प्रमुख |
| २ | कनिष्ठ अभियंता , जिल्हा परिषद, **बांधकाम** विभाग | सदस्य |
| ३ | वैद्यकीय अधिकारी, जिल्हा परिषद , आरोग्य विभाग | सदस्य |
| ४ | **अध्यक्ष**, विभागीय मंडळ यांनी निर्देशित केलेले शिक्षण क्षेत्राशी **तज्ज्ञ** व्यक्ती<br>**१)सातारा-श्रीमती माया बेलसरे मुख्या. धावडशी हायस्कूल, धावडशी ता.सातारा**<br>**२)सांगली-श्री मोने मुख्या. कांतीलाल पुरुषोत्तम शहा विद्यालय, विश्रामबाग,सांगली**<br>**३) कोल्हापूर-श्री मुळे मुख्या. स.म.लोहिया हायस्कूल, पेटाळा, कोल्हापूर**<br>**४) रत्नागिरी-श्री सुभाष देव प्राचार्य, गोगटे -जोगळेकर कॉलेज, रत्नागिरी**<br>**५) सिंधुदुर्ग-श्री टी.के.पाटील मुख्याध्यापक,**<br>**सौ.हि.भा.वरसकर विद्यामंदिर, बराड ता.मालवण** | सदस्य |

पथकप्रमुखास आवश्यकता वाटल्यास त्यामध्ये अन्य एका व्यक्तिस समाविष्ट करण्याचा अधिकार राहील.यानुसार गठीत करण्यात आलेल्या पथकाने आपला अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे सादर करावा.

१) विभागीय शिक्षण उपसंचालकांनी पथकाचा अहवाल विचारात घेवून नियमानुसार कार्यवाही करुन व प्रथम मान्यतेसंदर्भातील आदेश संबंधित संस्थेस द्यावेत.

२) तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी प्रथम मान्यता दिलेल्या आदेशाची प्रत व पथकाचा तपासणी अहवाल तसेच संलग्नता देण्याबाबत व मंडळ सांकेतिक क्रमांक देण्याबाबत स्पष्ट शिफारसीसह सर्व कागदपत्रांसह प्रस्ताव विभागीय अध्यक्ष विभागीय मंडळ यांचेकडे पाठवावा.

३) ज्या शासन परवानगी प्राप्त शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष सन २०११-१२ मध्ये इ. १० वी वर्ग सुरु होणार आहे अशा शाळांची तपासणी, प्रथम मान्यता व संलग्नीकरण याबाबतची कार्यवाही तातडीने करावयाची असल्याने अशा शाळांची त्वरित तपासणी करुन अ.क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल या विभागीय मंडळास सादर करणेसंदर्भात त्वरित कार्यवाही करण्यात यावी ही विनंती. जेणेकरुन अशा शाळामधील विद्यार्थी मंडळाच्या परीक्षेस वंचित राहाणार नाहीत याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

आपला विश्वासू,

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत: पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी-

१)शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सातारा/सांगली/कोल्हापूर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग यांना कळविण्यात येते की वरीलप्रमाणे आपलेकडून पथकाची निर्मिती करुन शाळांना मान्यता व संलग्नीकरण देण्याबाबतचा तपासणी अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना सादर करावा.

२)पथक सदस्य क्र. ४ ____________ यांना कळविण्यात येते की, आपली मंडळाव्दारे उपरोक्त पथकामध्ये सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. आपण शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचेशी संपर्क साधून शाळांना भेटी द्याव्यात.

प्रत माहितीसाठी-

१)महाराष्ट्र शिवाई साहित्य कला प्रतिष्ठान, सातारा
२)कराड जनता चॅरिटेबल एज्युकेशनल ॲण्ड सायंटिफिक रिसर्च सेंटर, कराड जि. सातारा
३)तिरंगा एज्युकेशन सोसायटी, पाचवड ता. वाई जि. सातारा
४) सांगली मिशन सोसायटी, सांगली जि. सांगली
५) संजीवनी चॅरिटेबल ट्रस्ट, कुरुंदवाड ता. शिरोळ जि. कोल्हापूर

यांना कळविण्यात येत की, तपासणी पथकास योग्य ते कागदपत्रे उपलब्ध करुन योग्य ते सहकार्य करावे व आवश्यक ते शुल्क भरुन मंडळाची संलग्नता व सांकेतिक क्रमांक मिळणेबाबत विहित कागदपत्रांची पूर्तता करुन प्रस्ताव शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचेव्दारे विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचे शिफारसीसह विभागीय मंडळास तातडीने सादर करणेबाबत कार्यवाही करावी.

My com/d/cbse pattern manyata /cbse april 2011/1-2